# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २४.०३.२०२४

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २३/०३/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३०,०५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणा अंतर्गत दि. २३/०३/२०२४रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण १० ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण १०,६८०/— रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यातयेत आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २३/०३/२०२४ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण १९ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण २५,०७५/— रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरुध विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगाणाया विरुध विशेष अंतर्गत दि. २३/०३/२०२४ रोजी पोस्टे नर्सी ना. व हिंगोली ग्रा. अशा एकुण ०२ ठिकाणी कलम ४/२५ भारतीय कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.

**अवैधरित्या वाळुची चोरी करणाऱ्या विरुध कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये संयुक्त पथकाने केलेली कार्यवाही अवैधरित्या वाळुची चोरी करण्याऱ्या विरुध दि. २३/०३/२०२४ रोजी एकुण ०१ ठिकाणी कलम ३७९भादवी सहकलम ४८(७)(८) गौ.ख.अधि अन्वये कार्यवाही करण्यात आली.

१) पोस्टे सेनगाव हददीत मौजे कापडसिंगी ते मौजा रोडवर कापडसिंगी हद्दीत पश्चिमेस २५ किमी बिट नं ५ या ठिकाणी १)८,००,००० रू ४०७ हाफ बॉडी वाहन क्र..एम.एच.३७ डब्ल्यु १९८१ २)५००० रू १ ब्रास रेती असा एकुण ८,०५,००० रू चा मुद्देमाल यातील आरोपी १ याने आरोपी क्र २ यासे सांगणे वरून वाहण क्र. एम.एच.३७ डब्ल्यु १९८१ मध्ये अंदाजे १ ब्रास रेती वाळु ची स्वत:चे फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशिर रित्या महाराष्ट्र शासनाचे महसुल बडुवुन रेती ची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आले म्हणुन गुन्हा.

**अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत गुटखा विकत्यावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत दि. २३/०३/२०२४ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथील रामलिला मैदानाच्या बाजुस खाकीबाबा शाळेच्या भिंती लगत पलटन मस्जीद जाणारे रोडचे बाजुस टिनपत्राचे शेडमध्ये हिंगोली येथे उत्तरेस १ किमी नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला वेगवेगळया कंपणीचा सुगंधीत गुटखा हा मानवी स्वास्थास अपायकारक विषारी घटक आहे हे माहिती असतांना सुध्दा आरोपी हा त्याचे स्वत:चे फायद्यासाठी शासनाने बंदी घातलेला विमल पानमसाला विमल तंबाखु गोवा गुटखा असा एकुण ६२५० रू स्वत:चे फायद्यासाठी चोरटी विक्री करणे करीता असतांना छापा मारतांना आम्हास गणवेशात आल्याचे पाहुन पळुन गेला म्हणुन गुन्हा.